॥श्री॥

# अध्यात्मशास्त्रातील काही पारिभाषिक शब्दांची सूची

## अ

**अंतर्यामी** - मनोवृत्तीचा नियामक, जीवात्मा, परमात्मा, वायू, आत राहून नियमन करणारा ईश्वर.

**अंतःकरणचतुष्टय** - कार्यानुरूप असलेल्या अंतःकरणाच्या चार वृत्तींचा समुदाय - १) मन - संकल्पविकल्पात्मिका वृत्ती २) बुद्धी - निश्चयात्मिका वृत्ती ३) चित्त - अवधारणात्मिका वृत्ती ४) अहंकार - अहं अहं (मी मी) असे म्हणावयाला लावणारी वृत्ती.

**अकृताभ्यागम** - जे केलेले नाही त्याचे फळ मिळणे. या जन्मी अथवा पूर्वजन्मी न केलेल्या कर्माचे चालू जन्मात फळ मिळणे हा तर्काच्या दृष्टीने एक दोष आहे.

**अखंड** - खंड किंवा भाग नसलेला, निरवयव, निरंश, अपरिच्छिन्न.

**अजातवाद** - जीव किंवा जग झालेलेच नाही. फक्त ब्रह्म आहे ही विचारसरणी.

**अध्यारोप - अपवाद** - जे जेथे वास्तविक नाही तेथे ते आहे अशी सोयीसाठी कल्पना करणे किंवा त्याची प्रतीती घेणे म्हणजे अध्यारोप. जग आहे व ते निर्माण झाले आहे असे सर्वसामान्यांना खात्रीपूर्वक वाटते. त्यांना पटवून देण्यासाठी तात्पुरते त्यांचे मत स्वीकारून जगाच्या निर्मितीचे स्पष्टीकरण दिले जाते. जे नाही, ते आहे असे स्वीकारणे हा आरोपच असल्याने या पद्धतीला अध्यारोप असे म्हणतात. उदा.- एकोऽहं बहुस्याम् - मी एकटा आहे, मी अनेक व्हावे अशी ब्रह्माला इच्छा झाली असे म्हणणे हा अध्यारोप. कारण ब्रह्म अमन असल्यामुळे त्याला अशी इच्छा होणे शक्य नाही. जग हे ब्रह्माच्या ठिकाणी भासमान होते.

अपवाद म्हणजे सत्य काय ते सांगणे. जग आहे या भ्रामक प्रतीतीचा त्याग करून फक्त ब्रह्मच आहे हा निश्चय करणे. थोडक्यात, जगाचे मिथ्यात्व समजावून सांगण्यासाठी जगाचे उपादानकारण ब्रह्म आहे असा आरोप केला जातो (अध्यारोप). मग श्रुतिप्रामाण्याने त्याचे खंडण केले जाते. यालाच अपवाद करणे म्हणतात.

**अध्यात्म** - १) देह २) आत्म्यासंबंधी ३) मन ४) ब्रह्म ५) Belonging to self or person ६) The supreme spirit manifested as an individual self ७) Brahma is supreme, its manifestation as an individual self is अध्यात्म ८) जो देहाच्या उत्पत्ती-नाशामुळे उत्पन्न-नष्ट होत नाही असा देहातील कूटस्थ - साक्षी - आत्मा.

**अध्यस्त** - ज्या पदार्थाचा भ्रम झालेला असतो तो पदार्थ आणि त्याचे ज्ञान. अध्यस्त पदार्थ प्रत्यक्षात अस्तित्वात नसतो. ज्यावर तो भासतो त्या अधिष्ठानाहून अध्यस्त पदार्थ पूर्णतया वेगळा असतो. तो अधिष्ठानाहून वेगळ्या स्वभावाचा, वेगळ्या रूपाचा व अस्तित्वाच्या वेगळ्या स्तराचा असतो. उदाहरण रज्जू-सर्पाचे आहे. जेव्हा रज्जूवर साप भासतो तेव्हा रज्जू ही व्यावहारिक सत्तेतील असून साप हा प्रातिभासिक सत्तेतील आहे. हा भ्रम अपुऱ्या उजेडात भासमान सर्पाचे अधिष्ठान असलेल्या दोरीचे पूर्ण ज्ञान होऊ न शकल्याने होऊ शकतो. सत्य वस्तू एकच असते. अध्यस्त वस्तू अनेक भासू शकतात. अधिष्ठानाच्या ज्ञानाने अध्यस्ताची निवृत्ती होते म्हणजेच आरोपित पदार्थ मिथ्या आहे असा निश्चय होतो. याला बाध असे म्हणतात. ब्रह्म या अधिष्ठानावर जगत् हे भ्रमाने भासते हे सिद्ध झाल्यावर आरोपित जगाचे मिथ्यात्व आपोआप सिद्ध होऊन 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' हा अद्वैताचा परम सिद्धान्त होतो.

**अध्यास** - भ्रम - विवर्त (शास्त्रीय नाव). अध्यास हा शब्द श्रीशंकराचार्यांनी वेदान्तसूत्राच्या भाष्यात उपोद्घातात प्रथम वापरला आहे. आत्मा (ब्रह्म) अकर्ता, अभोक्ता आहे असे श्रुती सांगते. पण व्यवहार करतांना प्रत्येक मनुष्य 'मी कर्ता, मी भोक्ता, मी हुषार, मी गोरा' इत्यादी मानतो. त्यामुळे श्रुती आणि प्रत्यक्ष प्रमाण यात येणारा विरोध नाहीसा करण्यासाठी आणि व्यवहाराची सिद्धी होण्यासाठी अध्यास ही संकल्पना स्वीकारली आहे. व्याख्या - अतद् तद्बुद्धि - ज्या ठिकाणी जे नाही ते दिसणे. लौकिकात यालाच भ्रम म्हणतात.

**अदृष्ट** - पापपुण्य, संचित.

**अनिर्वचनीय** - सत्-असत्हून वेगळा असलेला बाधयोग्य पदार्थ. बाध होण्यासारखा. सत् म्हणजे ज्याचा कालत्रयीही बाध होत नाही असा. सताहून विलक्षण म्हणजे सत्च्या लक्षणाशी न जुळणारा, वेगळा. असत् म्हणजे जे कधीच अस्तित्वात नसते ते. अशा वंध्यापुत्रासारख्या असताहूनही विलक्षण (वेगळा) असलेला. उदा. रज्जूवर दिसणारा साप. अज्ञानाचे कार्य असलेला साप व्यावहारिक सत् म्हणावा तर दोरीच्या ज्ञानाने त्याचा बाध होतो आणि वंध्यापुत्राप्रमाणे असत् म्हणावा तर तो प्रत्यक्ष दिसतो. म्हणून हा सर्प सत्-असताहून विलक्षण आहे म्हणजेच अनिर्वचनीय आहे. जगही असेच आहे. ते भासते म्हणून ते असत् नाही व ते निर्माण झाले, आता आहे व पुढे नष्ट होणार आहे म्हणजे ते त्रिकालाबाधित नाही व म्हणून ते सत्ही नाही. म्हणून ज्याच्या स्वरूपाचे निश्चित निर्वचन (वर्णन) करता येत नाही ते. अज्ञानावस्थेत जे सत्य वाटते आणि ज्ञानावस्थेत जे बाधित होते ते अनिर्वचनीय असते. वेदान्तमत जगाला अनिर्वचनीय म्हणजे बाधयोग्य असेच म्हणते.

**अनुग्रह** - पूर्णपणे स्वीकार करणे.

**अनुबंध चतुष्टय** - १) शास्त्रीय किंवा पारमार्थिक ग्रंथाची बंदिस्त चौकट. २) ज्याच्या ज्ञानाने मुख्य ग्रंथात प्रवेश होतो म्हणजे ग्रंथ वाचतांना तो कशा दृष्टीने वाचावा हे कळते आणि समजून घेणे सोपे जाते त्या चार गोष्टी. अधिकारी, विषय, प्रयोजन आणि संबंध ह्यांना अनुबंध चतुष्टय म्हणतात.

**अन्वय** - यत् सत्त्वे यत् सत्त्वम्। - कार्य आहे म्हणजे कारण हे आहेच. अनु अयं म्हणजे मागोमाग जाणे. शब्दश: अर्थ - जोडणे. फुलांच्या माळेत फुले अनेक असतात. त्यांना एकत्र ठेवणारा दोरा एकच असतो. प्रत्येक फूल जरी वेगळे असले तरी त्या प्रत्येक फुलात दोरा मात्र एकच असतो. म्हणजे दोऱ्याचा फुलांमध्ये अन्वय असतो. माळेचे कारण दोरा आहे. ते काढले तर माळ राहणार नाही. तसे एका आत्म्याचा देहाच्या सर्व अवस्थांमध्ये अन्वय असतो. अवस्था बदलली तरी आत्मा एकच असतो. त्यात काहीही फरक नसतो. त्याच्याच सत्तेवर जीवाचे अस्तित्व अवलंबून असते. ज्याचा अन्वय असतो त्याची स्वतंत्र सत्ता असते, म्हणजे कार्याचे अस्तित्व त्याच्यावर अवलंबून असते.

**अनुमान** - वृत्तिज्ञानाच्या सहा प्रमाणांपैकी एक प्रमाण. प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारे केलेला तर्क.

**अनुभूती - अनुभव** - जीवाचे ब्रह्माशी ऐक्य होणे, जीव ब्रह्मच आहे असा एकत्वाने अनुभव येणे.

**अनुसंधान** - अखंड आत्माकार वृत्ती.

**अनुर्वाच्य** - बुद्धिगम्य नसल्यामुळे ज्याचे वर्णन करता येत नाही असे (म्हणजे ब्रह्म).

**अपरोक्षज्ञान** - जीवब्रह्मैक्याचा प्रत्यक्ष अनुभव.

**अभानावरण** - अज्ञानाची आवरण शक्ती. ही स्वरूप झाकते व त्यामुळे 'मला आत्मा माहीत नाही' (आत्म्याचे भान नसणे) असे वाटते.

**अभाव** - नसलेपणा (भाव म्हणजे अस्तित्व. त्याविरुद्ध अ-भाव).

**अभ्युदय** - व्यावहारिक वैभव.

**अभिज्ञा** - अंतःकरणवृत्तीचा विषयाशी प्रत्यक्ष संबंध आल्याने होणारे ज्ञान.

**अलिप्त** - निर्लेप, असंग, संगरहित.

**अवतार** - मूळ स्थितीहून खाली येणे.

**अवस्था** -१) जागृती २) स्वप्न ३) सुषुप्ती ४) तूर्या.

१) जागृती - ईशनिर्मित सृष्टीशी जेव्हा जीव व्यवहार करतो तेव्हा त्याच्या त्या अवस्थेला जागृती म्हणतात. या अवस्थेच्या अभिमानी जीवाला विश्व म्हणतात. २) स्वप्न - मनोनिर्मित प्रातिभासिक पदार्थांचा भोग घेणारी जीवाची अवस्था. या अवस्थेच्या अभिमानी जीवाला तैजस म्हणतात. ३) सुषुप्ती - इंद्रिये व अंतःकरण यांच्या लयरूप गाढ निद्रेची अवस्था. या अवस्थेच्या अभिमानी जीवाला प्राज्ञ असे म्हणतात. ४) तूर्यावस्था - तीन देह (स्थूल, सूक्ष्म, कारण), तीन अवस्था (जागृती, स्वप्न, सुषुप्ती), तीन स्थाने (नेत्र, कंठ, हृदय), तीन भोग (स्थूल, प्रविविक्त, आनंदावभास) आणि तीन भोक्ते (विश्व, तैजस, प्राज्ञ) अशा जीवाच्या पंधरा घटकांच्या पलिकडे असलेली, त्यांचे साक्षित्व करणारी अवस्था. या अवस्थेच्या अभिमानी जीवाला प्रत्यगात्मा म्हणतात.

**अव्याकृत** - १) अव्यक्त स्वरूपाचे - ज्ञानेंद्रियांना कळण्याच्या स्वरूपात न आलेले. २) मायोपाधिक ईश्वर ३) सांख्यांचे प्रधान - सांख्य तत्त्वज्ञानात ब्रह्माव्यतिरिक्त प्रकृती किंवा प्रधान हे जड, स्वतंत्र आणि वेगळे तत्त्व मानतात. सृष्टीला हे कारण आहे असे त्यांचे मत आहे.

**अविद्या** - पंचक्लेशांपैकी एक क्लेश. सत्त्वप्रधान प्रकृतीचा मलिन सत्त्वप्रधान (रज आणि तम गुणाने युक्त) अंश. यालाच व्यष्टिअज्ञान असेही म्हणतात. जागृतीत व्यष्टिअज्ञान बुद्धिरूपाने कळते व सुषुप्तीत ते व्यष्टिअज्ञान याच स्वरूपात असते. ब्रह्म, व्यष्टिअज्ञान आणि व्यष्टिअज्ञानात पडलेले ब्रह्माचे (आत्म्याचे) प्रतिबिंब या तिन्हीला मिळून जीव म्हणतात. अविद्येला जीवाचा कारणदेह व पंचकोशातील आनंदमय कोश म्हणतात. ती मलीन सत्त्वप्रधान होऊन जीवाला 'देह म्हणजे मी', 'जग सत्य आहे', 'मी कर्ता व भोक्ता आहे' असे देहतादात्म्य निर्माण करून संसारात बद्ध करते. अविद्या ही जीवाला व्यापक ब्रह्मापासून वेगळे बनविणारी उपाधी आहे. जीवाच्या पारमार्थिक ब्रह्मस्वरूपावर ती आच्छादन करते.

**अष्टधा प्रकृती** - पंचमहाभूते + त्रिगुण; पंचमहाभूत + मन + बुद्धी + अहंकार.

**अत्र** - इहलोक

**असत्** - कधीही अस्तित्वात नसणारे. अभावरूप. उदा. आकाशपुष्प, सशाचे शिंग वगैरे.

**असत्त्वावरण** - आत्म्याचे अस्तित्व जाणवू न देणारे अज्ञानाचे आवरण (आत्मा नाही अशी भावना करणारे आवरण).

**असंग** - संगरहित, निर्लेप.

**अहंकार** - १) अंतःकरणाची एक वृत्ती. २) मी म्हणजे विशिष्ट व्यक्ती आहे अशी जाणीव ३) गर्व - सामान्य व्यवहारात गर्वाला अहंकार म्हणतात. ४) व्याख्या - अहं अहं कारयति इति अहंकारः। विमल ब्रह्मावर 'मी आहे' ही अहंवृत्ती उठली व सृष्टीनिर्मितीला सुरुवात झाली. मलीन अहंकाराच्या आवरणामुळे जीव वस्तुतः ब्रह्म असून स्वतःला त्याहून वेगळा मानू लागला.

योगवाशिष्ठात अहंकाराचे तुच्छ, शुभ आणि परम असे तीन प्रकार सांगितले आहेत. १) तुच्छ अहंकार - मी स्थूल देह आहे. २) शुभ अहंकार - मी सूक्ष्म देह आहे. ३) परम अहंकार - मी ब्रह्म आहे (अहं ब्रह्मास्मि).

## आ

**आगम निगम** - श्रुती व स्मृती.

**आत्मनिवेदन** - आत्म्याच्या ठिकाणी 'स्व'चे केलेले संपूर्ण विलीनीकरण.

**आत्मा (आत्मन्)** - आत्मा हा शब्द वेदान्तशास्त्रातील ग्रंथात निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या अर्थाने वापरला आहे. संदर्भानुसार त्याचा अर्थ लावून घ्यावा लागतो. त्याचे खालील अर्थ आहेत. १) ब्रह्म २) व्यष्टिपरिच्छिन्न जीवात्मा ३)

कूटस्थ ४) देह ५) बुद्धी
६) महत्तत्त्व ७) स्वरूप ८) स्वभाव.

**आत्यंतिक निवृत्ती** - कार्याची कारणासह निवृत्ती.

**आधार व अधिष्ठान** - भ्रम झाला असतांना ज्यावर भ्रम होतो, त्याचे सामान्य रूप (सत् - अस्तित्व) हे भ्रांतिज्ञानाशी एकरूप होऊन तो अध्यस्त पदार्थ सत्य आहे असे वाटते. या सामान्य रूपाला आधार म्हणतात. ब्रह्माचे सत् हे सामान्य रूपच जगताचा आधार आहे. भ्रमज्ञानकाली पदार्थाचे विशेष रूप झाकले जाते आणि विशेषरूपाचे ज्ञान झाले की भ्रमच नाहीसा होतो. या विशेषरूपालाच अधिष्ठान असे म्हणतात.

**आनंद** - कशावर वा कोणावरही अवलंबून नसलेले सुख.

**आप्तवाक्य** - आप्तस्तु यथार्थ वक्ता। आप्ताचे वचन

**आरंभवाद** - सृष्टिनिर्मितीची प्रक्रिया सांगणारी एक विचारसरणी. यानुसार एका पदार्थापासून दुसरा वेगळाच पदार्थ निर्माण होतो. जसे सुतापासून वस्त्र. या मतानुसार ब्रह्मापासून जग असेच निर्माण झाले असून ते सत्य आहे.

**आसक्ती** - पूर्ण लिप्तता (आत्यंतिक ममत्व).

**आलंबन** - निर्गुण-निराकार ब्रह्मोपासनेसाठी सोय म्हणून स्वीकारलेली सगुण साकार ब्रह्माची (म्हणजे ईश्वराच्या अवताराची) विविध प्रतीके.

**आवरण** - मनुष्याच्या अंतःकरणातील तीन दोषांपैकी एक. (इतर दोष - मल, आणि विक्षेप) अज्ञानाच्या आवरणामुळे प्रथम विक्षेप व नंतर मल निर्माण होतो.

**ओषधी** - एकदाच फळ देऊन नाश पावणारी वनस्पती. उदा. गहू, भात, मका, केळी इ.

## ई

**ईश्वर** - सगुण-निराकार तत्त्व. ईश्वर केवळ तर्काने व शास्त्राने सिद्ध होतो. ब्रह्म, शुद्धसत्त्वगुणप्रधान माया व त्यात पडलेले ब्रह्माचे प्रतिबिंब हे तीन मिळून ईश्वरतत्त्व तयार होते (मायाविशिष्ट साभास चेतन). शुद्धसत्त्वप्रधान मायेमुळे ईश्वर मायेच्या आधीन असत नाही. ईश्वर हा सर्वशक्ती, सर्वज्ञ, विभू (व्यापक), ईश म्हणजे सर्वांचा प्रेरक-नियामक, स्वतंत्र म्हणजे कर्माधीन नसलेला, परोक्ष म्हणजे अप्रत्यक्ष, मायी म्हणजे माया ज्याच्या स्वाधीन आहे असा, आणि बंधमोक्षरहित असा तो आहे. तो जगाचे निमित्त कारण आहे. माया ही ईश्वराची उपाधी आहे. ईश्वर हा 'तत्त्वमसि' मधील तत् पदार्थाचा वाच्यार्थ आहे.

**ईश्वरतनुचतुष्टय** - ईश्वराचे चार देह - १) विराट २) हिरण्यगर्भ ३) ईश्वर ४) अव्याकृत (माया).

**ईशसृष्टी** - ईश्वराने निर्माण केलेली सजीव व निर्जीव सृष्टी.

**ईषणा** - तीव्र वासना. मुख्य तीन ईषणा - लोकेषणा, वित्तेषणा, दारेषणा.

## उ

**उदास** - १) आशा नाहीशी झालेली असून नैराश्य (दुःख) मात्र अजिबात नसलेला. २) ज्याला कसलीही इच्छा राहिलेली नाही असा.

**उन्मनी** - काहीजण हिला अवस्था म्हणतात. द्वैताचा अनुभव देणारे मन शिल्लक न राहिल्यामुळे आलेला अद्वैताचा अनुभव, तूर्या अवस्था परिपक्व झाली की तीच उन्मनी म्हटली जाते. जीवब्रह्मैक्याची अवस्था. जीवन्मुक्त या अवस्थेत अधिक असतो.

**उपरती** - १) आत्मज्ञानाच्या तीव्र इच्छेने केलेला गृहादिकांचा वस्तुत्याग वा संगत्याग २)बाह्यविषयांपासून पराङ्मुख

होणे.

**उपहित** - उपाधीमुळे वेगळा पडलेला भाग.

**उपाधी** - १) जी वस्तू जेवढी जागा व्यापते तेवढ्याच जागेतील पदार्थाचे ज्ञान करून देऊन आपण वेगळी राहते तिला उपाधी म्हणतात. उदा. घटाकाश. या ठिकाणी घटात असलेल्या आकाशाला व्यापक आकाशापासून घट वेगळा करतो व त्याचे 'घटाकाश' असे वेगळेपणाने ज्ञान करून देतो पण घटाचे गुणधर्म घटातील आकाशात नसतात. उपाधी आपले धर्म उपहितावर लादत नाही. त्याला इतर वस्तूंपासून फक्त वेगळा करून दाखविते. २) एक प्रकारची शक्ती, जी स्वतःशी संबंधित पदार्थास मूळ रूपापासून हटवून निराळ्या रूपाचा बनविते. घटाचा आकाशाशी संबंध आल्याने त्याला घटाकाश असे नाम व रूप मिळाले. ३) कारण.

**उपासना** - समान प्रत्ययाचा तैलधारेप्रमाणे अखंड प्रवाह (चित्ताने तेलाच्या धारेसारखे अखंड एकाच वस्तूचे चिंतन करणे) - अनुसंधान, पूजा, अभ्यास, चिंतन, ज्ञानप्राप्तीचे बहिरंग साधन. वेदविहित निष्काम उपासनेने चित्त शांत होते (स्थिर होते).

**उपादान कारण** - ज्या कारणाचा कार्यामध्ये प्रवेश असून ज्याच्यावाचून कार्य राहत नाही त्याला उपादान कारण म्हणतात. उदा. माती हे घटाचे उपादान कारण आहे. सोने हे दागिन्याचे उपादान कारण आहे.

## क

**कर्तृतंत्र** - कर्त्याच्या तंत्राने - कर्त्याच्या प्रयत्नानुसार किंवा कर्त्याच्या इच्छेनुसार मिळणारे फळ. कर्त्यावर व क्रियेवर अवलंबून असलेले फळ.

**कर्माचे प्रकार** - मनुष्य प्राण्याने कळत न कळत केलेला कोणताही शारीरिक, वाचिक किंवा मानसिक व्यवहार म्हणजे कर्म. कोणीही केव्हाही क्षणमात्र देखील कर्म केल्याखेरीज राहू शकत नाही. कर्माची विभागणी निरनिराळ्या प्रकारे करता येते.

अ) सामान्य कर्म - १) विहित (शुक्लकर्म) - करावे म्हणून सांगितलेले. त्यात नित्य, नैमित्तिक, काम्य व प्रायश्चित्त हे प्रकार आहेत. २) निषिद्ध कर्म (कृष्णकर्म) - करू नये म्हणून सांगितलेले. ब) संचितकर्म, प्रारब्धकर्म व क्रियमाण कर्म - १) संचित - मी देह, मी कर्ता, अशा बुद्धीने अनंत मनुष्यजन्मात जी कर्मे केली असतील आणि ज्या कर्मांच्या फलभोगास आरंभ झालेला नाही अशा कर्मांचा साठा. २) प्रारब्ध - संचितातून ज्या कर्मांच्या फलभोगास आरंभ होऊन वर्तमान शरीर प्राप्त झाले आहे अशा कर्मांचा समुदाय. ३) क्रियमाण - सध्याच्या शरीरात केले जाणारे कर्म. मनुष्याला या कर्माच्या बाबतीत स्वातंत्र्य आहे. त्यामुळे मनुष्यजन्माला कर्मयोनी म्हणतात. येथे देहबुद्धीने केलेली सर्व कर्मे चालू जन्मात अथवा पुढील कोणत्यातरी जन्मात फल देतातच. क) कर्माच्या प्रकारानुसार व्यावहारिक विभागणी - १) धर्मकर्म (वैदिक कर्म) - संध्या, पूजा वगैरे. २) व्यवसाय कर्म - उद्योग, व्यापार वगैरे. ३) देहकर्म - व्यायाम, स्वच्छता आदी. ४) कर्तव्य कर्म किंवा विहित कर्म - कुटुंब, राष्ट्र-वगैरेसंबंधीचे कर्म. ५) अध्यात्मकर्म - श्रवण, ध्यान वगैरे.

कर्मामुळे ब्रह्मज्ञान होत नाही हे निश्चितपणे माहीत हवे. वेदविहित निष्काम कर्माने चित्त शुद्ध होते - वस्तुसिद्धिर्विचारेण न किंचित्कर्मकोटिभिः। (श्रीमत् शंकराचार्य).

**करण** - १) ज्ञानाचे साधन २) इंद्रिय ३) असाधारण कारण - उदा. घट निर्माण करतांना दंड किंवा चक्र ही साधने फक्त घटाच्या निर्मितीला उपयोगी आहेत, कापड विणण्यासाठी नाहीत. म्हणून दंड व चक्र यांना घटाची असाधारण कारणे किंवा करणे म्हणतात.

**काल** - जीवनातील घटनांचा क्रम लक्षात घेण्याच्या मानवी प्रवृत्तीतून निर्माण झालेले सापेक्ष तत्त्व. नासदीय सूक्तातील

'तदानीं' म्हणजे 'तेव्हा' हा शब्द विश्वनिर्मितीच्या घटनेचा काल सुचविणारा शब्द आहे. नव्या विज्ञानानुसार काल हे तत्त्व काल्पनिक आहे. भगवद्गीता अ.१०, श्लो. ३३नुसार काल ही भगवंताची विभूती आहे. त्या वर्णनावरून काल संकल्पना स्पष्ट होते. ती अशी - भगवंत म्हणतात, अर्जुना, तो (काल) प्रलयकालाच्या अग्नीचाही नाश करतो, सर्व दाही वायूंना गिळून टाकतो, तो आकाशतत्त्वालाही आपल्या पोटात घेऊन नाहीसे करतो. असा जो अपार अनाकलनीय काल आहे तोच मी आहे.

**कीर्तन** - स्तुती करणे, कीर्तन करणे.

**कूटस्थ** - १) ऐरण. ज्याप्रमाणे सोनाराच्या ऐरणीवर कितीही दागिने घडले तरी ऐरणीत फरक पडत नाही त्याप्रमाणे अलिप्त असलेला म्हणजे निर्विकार असलेला २)कूट म्हणजे मिथ्या अशी जी बुद्धी, त्या बुद्धीत 'स्थ' म्हणजे असंगरूपाने राहिलेला - आत्मा. जीवपणाचे सर्व धर्म म्हणजे कर्तृत्व, भोक्तृत्व, पापपुण्य, सुखदुःख इत्यादी बुद्धीसह चिदाभासाचे आहेत. कूटस्थाचे नाहीत.

**कोश** -आवरण करणाऱ्या पदार्थाला कोश म्हणतात. आत्मा पंचकोशात बंदिस्त असल्यासारखा आहे. बंदिस्त करणाऱ्या त्या तत्त्वांना कोश असे म्हणतात. ते पाच प्रकारचे आहेत - १) अन्नमय - स्थूल शरीरास अन्नमय कोश म्हणतात. २) प्राणमय - पंच प्राण व पंच  कर्मेंद्रिये यांना प्राणमय कोश म्हणतात. ३) मनोमय - पंच ज्ञानेंद्रिये व संकल्पविकल्पात्मक अंतःकरणाची वृत्ती (मन) यांना मनोमय कोश म्हणतात. ४) विज्ञानमय - पंच ज्ञानेंद्रिये व अंतःकरणाची निश्चयरूप वृत्ती (बुद्धी) यांना विज्ञानमय कोश म्हणतात. ५) आनंदमय - कारणशरीराला आनंदमय कोश म्हणतात. व्यष्टिअज्ञान म्हणजेच कारणशरीर.

**कृतप्रणाश** - केलेल्या कर्मांचा भोगावाचून क्षय.

## ग

**गणेश** - गणांचा ईश तो गणेश. गण म्हणजे इंद्रियसमूह. इंद्रियसमूहाचा नियंता असलेला हृदयस्थ ईश्वर.

**गुण** - अष्टधा प्रकृतीतील तीन घटक - सत्त्वगुण, रजोगुण व तमोगुण.

**गुणसाम्य** - सृष्टीच्या प्रलयानंतरची बीजरूप असलेली सत्त्व, रज, तम या तीन गुणांची साम्यावस्था. हिलाच प्रधान असेही म्हणतात.

**गुणक्षोभिणी** - सृष्टिनिर्मितीच्या वेळी तीन गुणांच्या साम्यावस्थेत होणारा क्षोभ (संतुलन बिघडणे, कमीजास्त होणे), प्रकृती.

## च

**चरमवृत्ती** -संपूर्ण चराचरात एकच ब्रह्मतत्त्व (चैतन्यतत्त्व) व्यापून आहे अशी निश्चयात्मक अंतःकरणवृत्ती.

**चित्त** - पहा अंतःकरण चतुष्टय.

**चिदाभास** - अंतःकरणे प्रतिफलितं चैतन्यं चिदाभासः। अंतःकरणात प्रतिबिंबित झालेले जे चैतन्य तो चिदाभास होय. अंतःकरण सत्त्वगुणाचे कार्य असल्यामुळे स्वच्छ व निर्मल आहे. त्यामुळे त्यात ज्ञानरूप कूटस्थ चैतन्य प्रतिबिंबित होते. हे प्रतिबिंब आरशातल्या प्रतिबिंबासारखे नसून कंदिलाच्या काचेत आतील ज्योतीचा प्रकाश जसा फाकतो तसे आहे. अंतःकरण हे पूर्ण शरीरास व्यापून असल्याने चिदाभासही संपूर्ण शरीरास व्यापून असतो.

**चिन्मात्र** - केवल ज्ञान, शुद्ध जाणीवेची अवस्था.

**चैतन्याचे प्रकार** - वस्तुतः चैतन्य अखंड असल्याने त्याचे प्रकार संभवत नाहीत. परंतु आकलनाच्या सोयीसाठी

उपाधीसापेक्षतेने ते मानलेले आहेत - १) जीवचैतन्य
२) कूटस्थचैतन्य ३) ईशचैतन्य ४) ब्रह्मचैतन्य (हे उपाधिनिरपेक्ष असले तरी पहिल्या तीनच्या संदर्भाने हे उपाधिसापेक्ष आहे.).

## ज

**जाणीव** - ज्ञानतत्त्व, प्रज्ञान, वृत्तिज्ञान, ज्ञान.

**जीवन्मुक्त** - प्रारब्धानुसार जीवन चालू आहे व त्याच वेळी आत्मबोधावर आरूढ झाल्यामुळे अंतःकरण दशा मात्र मुक्ततेची आहे असा सिद्ध पुरुष.

**जीवब्रह्मैक्य** - जीव आणि ब्रह्म यांची मूळचीच असलेली एकरूपता.

## त

**तद्रूपता** - तदाकारता. तत् = ब्रह्म. ब्रह्मतत्त्वाशी साधलेली एकरूपता, सायुज्यता.

**तत्त्वचिंतक** - ब्रह्मतत्त्वाचे चिंतन करणारा (साधकावस्था).

**तत्त्वज्ञ** - ब्रह्मतत्त्वाचा आत्मत्वाने (मी ब्रह्म आहे असा) दृढ, अपरोक्ष व अपरिवर्तनीय असा अनुभव घेतलेला (सिद्ध).

## द

**दमन** - मूळ धातू दम् = वठणीवर आणणे, ताब्यात आणणे, शांत करणे. इंद्रिये स्वाधीन ठेवण्याला दमन म्हणतात.

**दर्शन** - १) विचार पद्धत २) मतप्रणाली ३) तत्त्वज्ञानाचा पंथ ४) A system of Philosophy ५) A doctrine or theory prescribed in a system.

भारतीय तत्त्वज्ञानात सहा आस्तिक (वेदप्रामाण्य मानणारी) दर्शने प्रसिद्ध आहेत.ती दर्शने व त्यांचे प्रगटकर्ते आचार्य असे - १) न्याय - गौतम २) वैशेषिक - कणाद ३) योग - पतंजली ४)सांख्य - कपिल ५) पूर्वमीमांसा - जैमिनी ६) उत्तरमीमांसा - वेदव्यास.

**दिक्** - दिशा

**दिव्य** - मूळ धातू दिव् = प्रकाशणे. दिव्य = अलौकिक, लोकोत्तर, दैवी, ईश्वरीय.

**देव** - दिव् = प्रकाशणे. स्वयंप्रकाश असलेले ज्ञानतत्त्व.

**देश** - जागा.

**देह** - वेदांतशास्त्राच्या बहुतेक ग्रंथात तीन प्रकारच्या देहांचे (शरीरांचे) वर्णन आहे. हे तीन देह म्हणजे कारणदेह, सूक्ष्मदेह आणि स्थूलदेह होत. काही ग्रंथात (उदा. दासबोध, विवेकसिंधू) महाकारणदेहाचे वर्णन केलेले आहे. कारणदेह - जीवावस्था किंवा ईश्वरावस्था होण्याचे जे कारण त्याला कारणदेह म्हणतात. व्यष्टिअज्ञान (मलिन सत्त्वप्रधान अविद्या) हा जीवाचा कारणदेह तर शुद्ध सत्त्वप्रधान माया ही ईश्वराचा कारणदेह. व्यष्टीच्या कारणदेहाचा अभिमानी प्राज्ञ तर समष्टीच्या कारणदेहाचा अभिमानी शंकर आहे. गाढ झोपेला कारणदेह म्हणतात कारण ती स्वप्न व जागृतीला कारण आहे. सूक्ष्मदेह - (लिंगदेह) पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, पाच प्राण व अंतःकरण मिळून सूक्ष्मदेह बनतो. तैजस व विष्णु हे अनुक्रमे व्यष्टी व समष्टी सूक्ष्म देहांचे अभिमानी आहेत. स्थूलदेह - पंचमहाभूतांच्या पंचीकरणानंतर स्थूल देह तयार होतो. विश्व व ब्रह्मदेव हे अनुक्रमे व्यष्टी आणि समष्टी स्थूलदेहांचे अभिमानी आहेत. महाकारणदेह - महाकारणदेहात सूक्ष्म 'अहं' शिल्लक असल्याने व तो स्वतःला वेगळा मानत असल्याने तो 'देह' म्हटला जातो. १) 'मी ब्रह्म आहे' शिवाय अंतःकरणवृत्तीला

जेव्हा अन्य कशाचेही भान नसते तेव्हा त्या सोऽहंला घट्ट पकडून ठेवलेल्या अंतःकरणवृत्तीला (सूक्ष्मबुद्धिवृत्तीला) महाकारणदेह म्हणतात. तूर्या ही महाकारणदेहाची अवस्था असून प्रत्यगात्मा हा तिचा अभिमानी आहे. आनंदावभास हा तेथे भोग आहे. २) नामाकार झालेली वृत्ती. महाकारण देहाच्या अधिक स्पष्टीकरणासाठी पाहा - विवेकसिंधू.

**दृश्य** - जाणीवेचा प्रांत. देहसापेक्ष आणि मन-बुद्धिसापेक्ष जाणीव, वृत्तिज्ञानाचा विषय.

**द्रष्टा** - पाहणारा. लोहचुंबकाच्या सान्निध्यामुळे जशी लोखंडाची सुई हालचाल करते त्याप्रमाणे परमात्म्याच्या आश्रयाने त्रिगुणमयी प्रकृतीच्या हालचाली सृष्टीत चालू असतात. जीवात्मा हा परमात्म्याचा अंश असल्यामुळे खरोखर तोही परमात्म्याप्रमाणे अकर्ता आहे आणि सृष्टीत वा देहात चाललेल्या सर्व हालचाली तो फक्त पाहत असतो. परंतु त्या जडाशी तन्मय झाल्याने स्वतःला कर्ता समजू लागतो. प्रत्यक्षात तो त्यांचा द्रष्टा म्हणजे पाहणारा किंवा साक्षी आहे.

## ध

**धर्म** - १) मूळ धातू धृ= धारण करणे, पोषण करणे, आधार देणे. जो धारण करतो, पोषण करतो, आधार देतो तो धर्म. २) स्थायीभाव - दृढ, अपरिवर्तनीय गुण. उदा. थंडपणा हा बर्फाचा धर्म आहे. ३) कर्तव्यकर्म - मातृधर्म, पितृधर्म, पुत्रधर्म इत्यादी ठिकाणी धर्म हा शब्द 'कर्तव्य' अशा अर्थी वापरला आहे. ४) नीती ५) वस्तूचा अपरिवर्तनीय गुण.

## न

**निर्गुण** - गुणातीत, गुणरहित.

**निमित्तकारण** - कार्य पूर्ण होण्यास आवश्यक असते परंतु कार्य पूर्ण झाले की ज्याचे काम संपते ते कारण. उदा. घटाच्या निर्मितीत कुंभार, त्याचा दंड, चक्र ही निमित्तकारणे आहेत.

जगाच्या निर्मितीत ब्रह्म हे सत्त्वगुणप्रधान ईश्वराच्या रूपाने निमित्तकारण असून तेच त्रिगुणात्मक मायेच्या रूपाने उपादानकारण आहे. त्यामुळे त्याला जगताचे अभिन्न निमित्तोपादानकारण म्हणतात.

**निरंजन** - निर्दोष.

**निरुपाधिक** - उपाधिशिवाय.

**निष्कल** - अंशरहित, निरंश.

**निष्काम** - फळाची इच्छा नसणे.

**निष्ठा** - झालेल्या निश्चयाच्या ठिकाणी असलेली बुद्धीची अविचल स्थिरता.

**निवृत्ती** - संन्यास मार्ग, मोक्षमार्ग. आत्यंतिक निवृत्ती - कारणासह कार्याची निवृत्ती. ज्याचा नाश झाल्यावर पुन्हा उत्पत्ती होत नाही त्या नाशास आत्यंतिक निवृत्ती म्हणतात. जेव्हा सर्व दुःखांना कारण असणाऱ्या आत्मस्वरूपाच्या अज्ञानाचा आत्मज्ञानाने नाश होतो तेव्हा सर्व दुःखे आणि त्यांची साधने यांची आत्यंतिक निवृत्ती होते. लयरूप निवृत्ती - अधिष्ठानज्ञानाने अध्यस्ताची अधिष्ठानातच निवृत्ती होते. रज्जूवर भासणाऱ्या सर्पाची रज्जूच्या ज्ञानाने रज्जूमध्ये निवृत्ती होते. अशा रीतीने कारणाच्या ठिकाणी कार्याची निवृत्ती होणे याला लयरूप निवृत्ती म्हणतात. निवृत्ती हा शब्द प्रवृत्तीच्या विरुद्ध अर्थानेही वापरला जातो. प्रवृत्तीचे फल अभ्युदय आहे तर निवृत्ती मोक्षाकडे घेऊन जाते.

**निर्विकल्प** - विकल्परहित, विकल्पशून्य, कोणत्याही विशेष जाणीवेशिवाय असलेले.

**निःश्रेयस** - मोक्ष, कल्याण, ज्ञान.

## प

**पंचकोश** - पहा - कोश

**पंचमहाभूते** - तन्मात्रारूप गुण जेथे राहतात ती तत्त्वे. आकाश, वायू, तेज, जल व पृथ्वी. ती तन्मात्रांच्या स्वरूपात असेपर्यन्त (सूक्ष्म) त्यांचे ज्ञान होऊ शकत नाही. पंचीकरणानंतर ती इंद्रियांनी ज्ञान होण्यास योग्य होतात.

**परावाणी** - स्फुरद्रूप मूळ वाणी.

**परिच्छेद** - तुकडा, भाग, अंश, अवयव. व्यापक ब्रह्मवस्तूला वास्तविक परिच्छेद नाही. पण भेदभ्रांतीमुळे तो आहे असे वाटते. परिच्छेदाचे देश, वस्तू व काल हे तीन मुख्य प्रकार आहेत. १) देशपरिच्छेद - सावयव वस्तू ठराविक जागाच व्यापते. त्यापलिकडे तिची व्याप्ती नसते. २) कालपरिच्छेद - एका विशिष्ट कालापुरती ती मर्यादित असते. ३) वस्तुपरिच्छेद - एका विशिष्ट ठिकाणी सुरू होते व तशीच संपते. ती व्यापक नसते.

**परिच्छिन्न** - मर्यादित, सीमित, ज्याला देश-काल-वस्तू यांची मर्यादा आहे असा.

**परिणाम** - उपादान कारण असलेल्या पदार्थाचे मूळ रूप जाऊन त्याला अन्य रूप येणे. एका अवस्थेचे किंवा रूपाचे दुसऱ्या पदार्थात अवस्थांतर किंवा रूपांतर होणे. नवीन पदार्थ सारख्या स्वभावाचा (समान स्वभाववान) पण वेगळ्या रूपाचा (अन्यथारूप) असतो. दोघांची सत्ता मात्र एकच असते. दुधाचे दही होणे हे परिणामाचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

**परोक्ष** - अप्रत्यक्ष.

**प्रकाश** - उजेड, ज्ञान, उघड करणे.

**प्रकृती** - १) सांख्य तत्त्वज्ञानानुसार सत्त्व, रज, तम गुणांची साम्यावस्था, स्वतंत्र आणि सत्यस्वरूप. अद्वैत वेदांतात अधिष्ठान ब्रह्माच्या सत्तेने प्रकृतीला अस्तित्व आहे. त्याचप्रमाणे काही ठिकाणी सृष्टी उत्पन्न करण्यासाठी योग्य झालेल्या तमोगुणप्रधान स्वरूपालाही प्रकृती म्हटले आहे. २) समवायी किंवा उपादानकारण.

परा प्रकृती - जिने संपूर्ण जग धारण केले आहे अशी ईश्वररूप चेतन प्रकृती. अपरा प्रकृती - अष्टधा प्रकृती - पंचमहाभूते, मन, बुद्धी आणि अहंकार अशी आठ प्रकारचे भेद असलेली ज्ञेयरूप आणि जड प्रकृती. परा आणि अपरा प्रकृतींच्या संयोगाने समस्त प्राणीमात्रांची उत्पत्ती, स्थिती आणि वृद्धी होते.

**प्रत्यगात्मा** - १) प्रत्येक जीवात राहून त्याला व्यापणारा आत्मा. हा इच्छा, संकल्प इत्यादी सर्व अंतःकरणधर्मांचा साक्षी असतो. तो असत्-जड-दुःखात्मक अशा अहंकारादिकांहून वेगळ्या प्रकाराने म्हणजे सद्रूप, चिद्रूप आणि आनंदरूपाने प्रकाशित होतो. २) प्रत्यक् - परत, मागे, विरुद्ध दिशेने म्हणजेच आत. इंद्रिये बाहेर धावतात. त्याना मागे वळवून आत शोध घेतला असता ह्याची जाणीव होते.

**प्रत्यभिज्ञा** - १) ज्या वस्तूचे एकदा ज्ञान झाले त्याच वस्तूचे स्थल, काल, परिस्थिती इ. बदलूनही पुन्हा ज्ञान होणे. २) ओळखणे ३) माहिती.

**प्रतियोगी** - विरोधी.

**प्रभू** - स्वामी, ईश्वर.

**प्रमाता** - सामान्यतः प्रमाता म्हणजे जीव. शास्त्रीय भाषेत प्रमाता म्हणजे अंतःकरणवृत्तीने मर्यादित केलेले चैतन्य. अंतःकरणवृत्तिद्वारा बाह्य पदार्थांचे ज्ञान करून घेणाऱ्या जीवास प्रमाता म्हणतात.

**प्रमाण** - प्रमाज्ञानास साह्यभूत असणाऱ्या साधनांना प्रमाण असे म्हणतात. ते सहा प्रकारचे आहे. १) प्रत्यक्ष प्रमाण - पंच ज्ञानेंद्रियांनी ज्ञान होणे. २) अनुमान प्रमाण - धूर दिसल्यावर 'अग्नी असल्याशिवाय धूर निर्माण होत नाही' या अग्नी व धूर यांच्यातील संबंधाच्या ज्ञानामुळे 'तेथे अग्नी असला पाहिजे' अशा पद्धतीने ज्ञान होणे. ३) शब्द प्रमाण - लौकिक व वैदिक आप्तवाक्य (सज्जन व वेद). ४) उपमान प्रमाण - उपमा देऊन 'याच्या सारखा तो असतो' असे सांगितल्यावर कधी तो प्रत्यक्ष दिसला तर 'तोच तो' म्हणून उपमेमुळे प्रत्यक्ष ज्ञान होणे. ५) अर्थापत्ती प्रमाण - कार्यज्ञानाने त्याच्या कारणाची कल्पना करणे. एखाद्या पदार्थाविषयी होणाऱ्या विशिष्ट ज्ञानाची उपलब्ध माहितीने संगती लागत नसली तर त्या कार्यावरून त्याच्या कारणाची कल्पना करावी लागते. हे कारणाचे ज्ञान अर्थापत्ती प्रमाणाने होते. ६) अनुपलब्धी प्रमाण - न

दिसण्यामुळे, उपलब्ध नसल्यामुळे होणारे अभावाचे ज्ञान.

**प्रमेय** - बाह्यवस्तुज्ञानात ज्या वस्तूचे ज्ञान करून घ्यावयाचे त्याला प्रमेय म्हणतात. उदा. घट, टेबल, खुर्ची वगैरे.

**प्रयोजन** - १) हेतू (कारण) २) फल.

**प्रवृत्ती** - बंधन करणारा हेतुपूर्ण (सकाम) कर्ममार्ग. प्रवृत्तीमुळे अभ्युदयाची (व्यावहारिक वैभवाची) प्राप्ती होते.

**प्रातिभासिक** -१) फक्त प्रतीतीच्या काळातच अस्तित्व असणे (प्रतीतीमात्र सत्तावान) २) आभासिक. उदा. स्वप्नस्थ पदार्थ. त्यांची फक्त स्वप्नाच्या काळातच प्रतीती असते.

**प्राण** - १) इंद्रियांना कार्यक्षम करणारी ऊर्जा २) पंचप्राणांचा समूह ३) पंचप्राणांपैकी एक(प्राण, अपान, व्यान, उदान, समान) ४) संपूर्ण चराचर सृष्टीचा आधार तथा पालनकर्ता.

**प्राज्ञ** - प्रायेण अज्ञ = जवळ जवळ अज्ञानी. सुषुप्ती अवस्थेमध्ये जीव हा कारण शरीराशी तादात्म्य पावलेला असतो. या अवस्थेत त्याला फक्त 'मला काही माहीत नाही' अशी स्थिती असते. या अवस्थेतील अभिमानी जीवाला प्राज्ञ म्हणजे जवळ जवळ अज्ञानी असे म्हटले आहे.

**प्रेयस** - इंद्रियांना प्रिय असे ऐहिक सुख.

## ब

**ब्रह्म** - व्यापक, भेदरहित, निराकार ब्रह्म कसे आहे हे निश्चितपणे सांगणे शक्य नसल्याने त्याचे वर्णन 'ते असे आहे, तसे आहे, असे नाही, तसे नाही' अशा पद्धतीने केले जाते. खालील विशेषणे तेच दाखवतात. प्रत्येक विशेषण, जीवाला असलेल्या पदार्थज्ञानावरून ब्रह्मस्वरूपाचा अंदाज करायला शिकवितात. १) नित्य - अनित्य अशा पदार्थांशी असलेल्या भ्रांतिजन्य तादात्म्याची निवृत्ती २) शुद्ध - कार्यरूप प्रपंचाच्या धर्मांशी असलेल्या तादात्म्याची निवृत्ती करण्यासाठी, रागद्वेषरहित. ३) बुद्ध - सर्वदा ज्ञान या एका अखंड रसाने युक्त असलेले. कारणभूत अज्ञानाची निवृत्ती. ४) मुक्त - अज्ञानकृत आवरणादिकांच्या तादात्म्याची निवृत्ती. ५) सत्य - मिथ्यात्वाची व्यावृत्ती. भूत, भविष्य, वर्तमान, उत्पत्ती, स्थिती, लय या तिन्ही काळी बाधित न होणारे. ६) अद्वय - दुसरे नसलेले. अखंड, एकरस, पाच प्रकारच्या भेदांशिवाय असलेले. ७) अनंत - ज्याला शेवट नाही असे. परिच्छिन्नतेची निवृत्ती. ८) स्वसंवेद्य - ज्ञानरूप. ज्ञानेंद्रिये व प्रमाणांनी न जाणले जाणारे. प्रमा-प्रमेय-प्रमाण (त्रिपुटी) निवृत्ती.९) सच्चिदानंदरूप - सत्- वस्तुनिरपेक्ष अस्तित्व, चित् - ज्ञेयनिरपेक्ष ज्ञान, आनंद - विषयनिरपेक्ष सुख हेच स्वरूप असलेले. १०) अनादी - ज्याला आदी म्हणजे सुरुवात नाही असे ११) चिरंतन - अंतरहित. इत्यादी इत्यादी.

**बद्ध** - मूळ अविद्येच्या आवरण आणि विक्षेप शक्तीमुळे 'मी ब्रह्म आहे' हे विसरलेला, जगत्सत्यत्व, कर्तृत्व-भोक्तृत्व, भोग, संग आणि विकारभ्रांती असलेला, व्यवहारासक्त.

## भ

**भ्रम**- भ्रम, अध्यास, विवर्त एकच. भ्रमाचे प्रकार - १) निरुपाधिक भ्रम - 'मी अज्ञ आहे, मी ब्रह्माला जाणत नाही' हा आंतर निरुपाधिक भ्रम तर रज्जूवर साप दिसणे हा बाह्य निरुपाधिक भ्रम. यात भ्रम गेल्यावर भासणारी उपाधी राहत नाही (सर्प ही दोरीची उपाधी आहे). २) सोपाधिक भ्रम - उपाधीच्या सान्निध्याने जिच्यात बदल (क्षोभ) झाला आहे अशा अविद्येपासून उप्तन्न होणारा आणि उपाधीच्या निवृत्तीने बाधित होणारा भ्रम. मातीचे घटात रूपांतर होते व घट ही मातीची उपाधी होते. भ्रम गेल्यावर घटबुद्धी नष्ट होते पण घट ही उपाधी तशीच राहते. बुद्धी या आंतर उपाधीमुळे 'मी कर्ता, मी भोक्ता' इत्यादी प्रकारची जी प्रतीति येते त्याला आंतर सोपाधिक भ्रम म्हणतात. स्वप्नातील वस्तूचे ज्ञान सुद्धा याच

प्रकारच्या भ्रमात समाविष्ट आहे. आत्मज्ञानी पुरुषाला आकाशादी बाह्य प्रपंचाचा जो अनुभव येतो तो विक्षेपशक्तियुक्त अज्ञानामुळे येतो. ह्या भ्रमाला बाह्य सोपाधिक भ्रम म्हणतात. ह्या ही ठिकाणी आत्मज्ञाची प्रपंचविषयीची सत्यत्वबुद्धी नाहीशी होते, प्रपंच तसाच राहतो. ३) संवादी भ्रम - भ्रम असूनही अनुकूल फल देणारा. ४) विसंवादी भ्रम - निष्फल भ्रम.

**भक्ती** - १) सगुण परमात्मा व जीव यामधील सकाम व निष्काम प्रेमसंबंध. २) निर्गुण परमात्म्याशी असलेली तदाकारता/एकरूपता.

**भूमा** - भूमन् १) ब्रह्म २) वैपुल्य ३) व्यापक.

**भान** - भा म्हणजे प्रकाशणे, शोभणे, दिसणे. भान म्हणजे वस्तू असण्याची जाणीव.

**भावरूप** - काही काळ ज्याला अस्तित्व आहे असा.

**भेद** - विभागणी, भिन्नभाव. मायिक पदार्थात स्वगत, सजातीय, विजातीय असे तीन भेद आहेत. भेद हे सावयव पदार्थात असतात. १) स्वगत भेद - पदार्थाच्या स्वरूपातील अंतर्गत भेद. झाडाची पाने, फुले, फांद्या इ. झाडातील स्वगत भेद आहे. २) सजातीय भेद - एकाच जातीच्या दोन पदार्थातीत भेद हा सजातीय भेद. उदा. एका आंब्याच्या झाडासारखे दुसरे आंब्याचे झाड असणे. ३) विजातीय भेद - भिन्न जातीच्या पदार्थातील भेद. उदा. झाड आणि दगड यांच्यातील भेद.

## म

**माया** - माया ही ब्रह्माची कल्पित शक्ती आहे. युक्तीपुढे ती टिकत नाही. शक्ती असल्याने ती ब्रह्माहून वेगळी नाही. ती ईश्वराच्या आधीन आहे, जगाचे उपादान कारण आहे. माया सतासताहून विलक्षण, अनादी परंतु सांत (अंत असलेली) आहे. माया म्हणजे मा या - मा(जी नाही) या (ती).

मायेला तिच्या कार्यानुसार निरनिराळी नावे आहेत - १)प्रकृती - तमोगुणप्रधान, जगाचे उपादान कारण २) शक्ती - निर्मितीसाठी व नंतरही आवश्यक . अघटित करून दाखविणारी, स्वतंत्र न राहता ब्रह्माच्या आश्रयाने राहणारी. ३)अज्ञान - ब्रह्मावर आवरण घालून त्याचे ज्ञान न होऊ देणारी. ४) अविद्या - ब्रह्मज्ञानाने नाश पावणारी, ज्ञानाला विरोधी. मी म्हणजे देह असे जिच्यामुळे वाटते ती. ५) प्रधान - अव्यक्त. प्रलयकाली ब्रह्मात बीजरूपाने राहणारे.

मायेची लक्षणे - १) स्वाश्रया - स्व म्हणजे ब्रह्माला धरून राहणारी, स्वतंत्र अस्तित्व नसलेली. २) स्वविषया - जी ब्रह्माविषयी सांगते ती. ३) स्वनिर्वाहक - स्व(ब्रह्म)चा निर्वाह करणारी. ब्रह्माविषयी कल्पना करण्यास प्रवृत्त करणारी. माया नसती तर ब्रह्माविषयी कोण बोलले असते? ब्रह्म आहे हे तिच्यामुळेच कळते. ४) परनिर्वाहक - स्व हून पर जे जग त्याची निर्मिती करणारी, देहतादात्म्य, जगत्सत्यत्व, कर्तृत्व-भोक्तृत्व या भ्रांतींची जननी.
५) प्रतीतीमात्रसत्तावान - जेवढा वेळ अध्यासाचा (जगताच्या) अनुभव असतो तेवढा वेळच सत्ता असणारी. ६) बाधयोग्य - अधिष्ठान ब्रह्माच्या ज्ञानाने बाधित होणारी.

**मीमांसा** - निर्णय होईपर्यंत केलेला सखोल विचार, चिकित्सा, षड्दर्शनांपैकी दोन दर्शने - पूर्व मीमांसा व उत्तर मीमांसा (वेदांत). पहिल्यामध्ये कर्मकांड व दुसऱ्यामध्ये ज्ञानकांडाचे विवेचन आहे.

**मुक्ती** - साधक परमेश्वराची ज्या रूपात उपासना करतो, त्या रूपाला तो प्राप्त होतो. साधक भक्ती करतांना स्वतःच्या वेगळ्या अस्तित्वाला जेवढे विसरेल तेवढा तो देवतारूप होईल. कनिष्ठ दर्जाच्या भक्ताला सलोकता म्हणजे आराध्य देवतेच्या लोकात जाऊन राहण्यास मिळते. त्याहून श्रेष्ठाला समीपता म्हणजे ईश्वराच्या अत्यंत जवळ जाणे ही मुक्ती मिळते. मृत्यूनंतर आराध्य देवतेसारखे रूप होणे ही सरूपता मुक्ती. जगाची उत्पत्ती इत्यादी व्यापार सोडून बाकी सर्व ऐश्वर्य अशा उपासकास प्राप्त होते. स्वतःला विसरून उपास्य देवतारूप होणे ही सायुज्य मुक्ती होय. ह्या चार मुक्तीशिवाय पाचवी

सार्ष्टी मुक्तीही कोणी कोणी मानतात.

**मुनी** - मननशील असणारा.

**मिथ्या** - १) जे त्रिकालाबाधित नाही ते (सान्त) २) ज्याच्या ठिकाणी जे नाही ते दिसणे. ३) बाधयोग्य ४) फसवे.

**मोक्ष** - कारणासहवर्तमान सकलदुःखनिवृत्ती आणि परमानंदाची प्राप्ती. सुखरूप होणे, सुखाने जगणे आणि सुखाने देहत्याग करणे. पुन्हा जन्माला न येणे.

## य

**योग** - १) युज् म्हणजे जोडणे. जीवाला ब्रह्माशी जोडणारी प्रक्रिया. कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग, अष्टांगयोग अशाअनेक प्रक्रिया आहेत. २) जे प्राप्त नाही त्याची प्राप्ती म्हणजे योग.

## ल

**लयचिंतन** - ब्रह्माभ्यासास उपयुक्त अशी एक प्रक्रिया. कार्याचा कारणात लय करविणारे मनन हे लयचिंतनाचे स्वरूप आहे. तैत्तिरीय उपनिषदात विश्वनिर्मितीचा क्रम आत्माU
आकाशUवायूUअग्नीUजलUपृथ्वीUओषधीUअन्नUपुरुष (प्राणी शरीरे) असा आहे. या सरणीत पुढील प्रत्येक घटक त्याच्या आधीच्या घटकाचे कार्य आहे आणि मागील घटक हा पुढील घटकाचे कारण आहे. आत्मा सर्वांचे मूळ कारण आहे. तो कोणाचेच कार्य नाही. कार्य हे कारणरूपच असते या नियमाचे चिंतन करून पुरुषाचा अन्नात, अन्नाचा ओषधीत याप्रमाणे लय करीत जाणे म्हणजे शेवटी परमकारण असा आत्माच उरेल. त्याचे अनुसंधान करावे.

**लयरूप निवृत्ती** -कार्याची कारणामध्ये जी निवृत्ती तिला लयरूप निवृत्ती म्हणतात.

**लयसाक्षित्व** - सर्व दृश्य पदार्थांचा व कल्पनांचा अभाव पाहणे.

**लक्षण** - ज्ञान करून देणारे, सुचविणारे. अध्यात्मशास्त्रानुसार असाधारण धर्म - जो धर्म अन्य कोणत्या पदार्थात नसून एका विशिष्ट पदार्थामध्येच असतो तो. लक्ष्यास (लक्षणावरून जाणण्यास योग्य) सजातीय आणि विजातीय पदार्थांपासून अलग करणे हे लक्षणाचे प्रयोजन (कारण) आहे. तटस्थ लक्षण - जे लक्षण लक्ष्याच्या ठिकाणी सतत राहणारे नसून काही काळ असते ते. ब्रह्म जेव्हा मायेचे अधिष्ठान होते तेव्हाच ते जगाच्या उत्पत्ती-स्थिती-लयाचे कारण होते. इतर वेळी असे म्हणता येत नाही म्हणून जगाची उत्पत्ती-स्थिती-लय यांचे कारणत्व हे ब्रह्माचे तटस्थ लक्षण आहे. स्वरूप लक्षण - स्वरूपं सत् व्यावर्तकं स्वरूपलक्षणम्। जे लक्षण लक्ष्याचे स्वरूप असून त्याला इतर पदार्थांहून वेगळे करते ते. सत्, चित्, आणि आनंद हे तीन धर्म ब्रह्माचे स्वरूप लक्षण आहेत.

**लक्षणा** - ऐकलेल्या वाक्यावरून विपरीत बोध होत असेल तर ते वाक्य बोधाशी सुसंगत जुळवून घेणे. तीन पद्धतीने लक्षणा केली जाते. १) जहत् २) अजहत् ३) जहदाजहत् (भागत्याग).

**लक्ष्यार्थ** - ज्या वाक्याचा अर्थ शब्दाच्या शक्तिवृत्तीने जुळत नसेल त्या ठिकाणी लक्षणावृत्तीने अर्थ घ्यावा लागतो. त्याला लक्ष्यार्थ म्हणतात. खरे अप्रगट स्वरूप (लक्ष्यांश).

## व

**वाच्यार्थ** - शब्दाच्या शक्तिवृत्तीने जो अर्थ घेतला जातो त्याला वाच्यार्थ म्हणतात. वरवर दिसणारा अर्थ.

**वाद** - तत्त्वज्ञानार्थ केलेली चर्चा; जगाकडे पाहण्याची दृष्टी, स्पष्टीकरण. अजातवाद, विवर्तवाद, बिंबप्रतिबिंबवाद,

दृष्टीसृष्टीवाद, सृष्टीदृष्टीवाद  वगैरे जगाची उत्पत्ती सांगणारे अनेक वाद प्रसिद्ध आहेत. १) अजातवाद - जीव किंवा जग झालेलेच नाही. फक्त ब्रह्म आहे. २) विवर्तवाद - ब्रह्मावर जगाचा केवळ भास होतो, रज्जूसर्पाप्रमाणे. ३) बिंबप्रतिबिंबवाद - आरशातील प्रतिबिंबाप्रमाणे ब्रह्माचे प्रतिबिंब म्हणजे जीव. ४) दृष्टीसृष्टीवाद - जोपर्यंत दृष्टी आहे म्हणजे पदार्थ समोर आहे तोपर्यंतच त्या पदार्थाला अस्तित्व आहे. ५) सृष्टीदृष्टीवाद -  सृष्टी आहे म्हणून दृष्टीला दिसते.

**वासना** - संस्कार; प्रवृत्तीमागे (वर्तन किंवा क्रियेमागे) असलेली प्रेरणा; कर्म,  इच्छा इत्यादींचे दृढ झालेले संस्कार. वासना मुख्यतः दोन प्रकारची आहे. १) मलीन वासना किंवा कुवासना - ब्रह्माच्या स्वरूपाला झाकणाऱ्या अज्ञानामुळे देहतादात्म्य व जगत्सत्यत्व भ्रांती होते. त्यामुळे ही वासना अत्यंत बलवान होते आणि तिच्या पूर्तीसाठी पुनर्जन्म घेण्यास भाग पाडते. २) शुद्ध वासना किंवा सुवासना - जी वासना ब्रह्मस्वरूपाच्या ज्ञानाकडे नेते. भाजलेली बी जशी अंकुरत नाही पण खाण्यासाठी उपयोगी पडते, त्याप्रमाणे जी वासना पुनर्जन्माचे मूळ खुडून टाकून केवळ प्रारब्धभोगासाठी देह सांभाळते व जिच्या योगाने अखंड, एकरस, आनंदरूप वस्तूचा साक्षात्कार होतो ती वासना.

**वस्तुतंत्र** - जो धर्म वस्तूच्या स्वाधीन असतो व ज्याच्या निर्मितीसाठी अन्य कोणाची गरज नसते. उदा. सूर्याची उष्णता वस्तुतंत्र आहे मात्र निखाऱ्याची उष्णता कोळसा पेटवून कोणाला तरी उत्पन्न करावी लागते म्हणजे ती कर्तृतंत्र आहे. याचप्रमाणे आत्मज्ञान वस्तुतंत्र असून पदार्थज्ञान कर्तृतंत्र आहे. आत्मज्ञान निर्माण करावे लागत नाही. त्याच्या आड येणारे दोष गेले की ते असतेच.

**वाणी** - वाणीचे चार प्रकार - वैखरी, मध्यमा, पश्यन्ती, परा. १) वैखरी - कानांना ऐकू येईल असे शब्द जिव्हेद्वारे बोलते, २) मध्यमा - मनात शब्द येतात पण मोठ्याने बोलले जात नाहीत, ३) पश्यन्ती - अर्थ माहीत असतो पण त्याला शब्दरूप नसते,  ४) परा - केवळ स्फुरण.

**विधी-निषेध** - करा व करू नका अशा धर्माज्ञा.

**विराग** - राग = आसक्ती. विराग = आसक्ती नसणे.

**विवर्त** - वि म्हणजे विपरीत. वृत् = वर्त म्हणजे दिसणे. एक असतांना एक भासणे. अधिष्ठानाहून विपरीत स्वभाववान आणि अन्यथारूप, त्याला विवर्त म्हणतात. उदा. दोरीवर सर्प भासणे.

**विषय** - विषुन्वति इति विषयः। म्हणजे जो जखडून टाकतो तो विषय. पंचज्ञानेंद्रियांनी मनाला जाणवणाऱ्या - कळणाऱ्या वस्तू. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पंचज्ञानेंद्रियांमुळे कळतात. तर्क, कल्पना वगैरेंच्या सहाय्याने कळणाऱ्या वस्तू मनबुद्धीमुळे कळतात. या सर्वांना विषय म्हणतात.

**विज्ञान** - १) आत्मज्ञानाला आलेली स्थिर अवस्था २) चिरंतन सत्य (ज्ञान) ज्या कारणांनी आणि ज्या पद्धतींनी भासते त्याचे ज्ञान. विश्वरचनेचे आणि उत्पत्ती-लयाचे ज्ञान.

**वैराग्य** - आसक्ती नसलेली अवस्था.

**व्यतिरेक** - यदाभावे यत् अभावम्। कारणच नाही तर कार्य नाही. तोडणे, मागे टाकणे, वेगळे करणे. माळेमध्ये सर्व फुलात एकच दोरा व्यापून असतो. तेथे फुलात दोऱ्याचा अन्वय असतो पण प्रत्येक फुलाची दुसऱ्या फुलापासून भिन्नता असते म्हणजे त्यांचा परस्पर व्यतिरेक असतो. तसेच जीवाच्या सर्व अवस्थात आत्म्याचा अन्वय असतो पण एक अवस्था दुसऱ्या अवस्थेत नसते. हा त्या अवस्थांचा परस्परांशी व्यतिरेक म्हटला जातो. ज्याचा व्यतिरेक असतो त्याची परतंत्र सत्ता असते म्हणजे ज्याचा अन्वय असतो, त्यावर तो पदार्थ अवलंबून असतो.

**वृत्ती** - विषयांचे ज्ञान करून देणारा (विषयप्रकाशक) अंतःकरणाचा परिणाम (बदल). संशय (मन), निश्चय (बुद्धी), स्मरण (चित्त), गर्व (अहंकार) यांनाही अंतःकरणाच्या वृत्तीच म्हणतात. अंतःकरणात अनेक वृत्ती (तरंग) निर्माण होतात व नाश पावतात. पण एकावेळी एकच वृत्ती असते. स्थूलबुद्धिवृत्ती - जी बुद्धिवृत्ती निश्चय करण्याच्या प्रक्रियेत असते ती. सूक्ष्मबुद्धिवृत्ती - ज्या बुद्धिवृत्तीचा निश्चय झाला आहे ती. ही जाणीवेत येत नाही.

**व्युत्थान** - समाधीतून उठणे किंवा जागे होणे.

## श

**शरीर** - शीर्यते इति शरीरं। जे क्षय पावते ते.
**शास्त्र** - माहीत नसलेले माहीत करून देते ते.

## ष

**षड्विकार** - अ) जे जे निर्माण होते त्याला सहा विकार असतात. ते असे - १) सत्ता - बीजरूपाने अस्तित्व २) जन्म ३) वृद्धी ४) परिणाम - बदल, विकास ५) अपक्षय - ऱ्हास ६) विनाश. ब) मनाचे सहा विकार - १) काम २) क्रोध ३) लोभ ४) मोह ५) मद ६) मत्सर.

## स

**संकल्पना** - सम्यक् कल्पना. सम्यक म्हणजे संपूर्ण, सर्वांगीण. सर्वांगीण बोध, समग्र अर्थ.
**संग** - वस्तूला मनाने चिकटणे.
**संबंध** - संयोग, जोडणे. हा चार प्रकारचा आहे. १) संयोगसंबंध - दोन सावयव द्रव्यांचा काही काळ टिकणारा संबंध. उदा. पक्षी व फांदी यांचा संबंध. २) समवाय संबंध - दोन सावयव द्रव्यांचा अखंड संबंध - या संबंधातून तिसराच पदार्थ बनतो. उदा. अनेक तंतूंचा संबंध आल्यावर कापड निर्माण होते. ३) तादात्म्य संबंध - दोन सावयव द्रव्ये एकच आहेत असे वाटणे. उदा. तापलेले लोखंड अग्नीरूप झाल्यासारखे वाटणे ४) आध्यासिक संबंध - प्रत्यक्ष संबंध नसतांना भ्रमामुळे संबंध आहे असे वाटणे. उदा. आत्मा व शरीर यांचा संबंध.
**संत** - सत् = जे नेहमी असते, नाही असे कधी होत नाही.
**संवित्** - शुद्ध ज्ञान, विमल ब्रह्म, ज्ञप्तिमात्र, सर्वप्रकाशक.
**सकाम** - फळाच्या अपेक्षेने केलेले कर्म.
**सगुण** - एका किंवा तिन्ही गुणांपासून उत्पन्न झालेला. उदा. जगत् - तमोगुण, ईश्वर - शुद्धसत्त्व, जीव - त्रिगुणात्मक.
**सत्संग** - सत्‌ला चिकटून राहणे. सत्पुरुष किंवा सद्ग्रंथांचा सहवास.
**सत्ता** - विद्यमानता, अस्तित्वाचा स्तर, अनुभवाची कक्षा. सत्ता ही पारमार्थिक, व्यावहारिक आणि प्रातिभासिक अशी तीन प्रकारची आहे. ब्रह्माची पारमार्थिक सत्ता आहे कारण ती तिन्ही काळात बाधित होत नाही. पंचमहाभूते व त्यांचे कार्य यांची व्यावहारिक सत्ता आहे कारण व्यवहारकाळी तिचा बाध होत नाही. ही फक्त तत्त्वज्ञानानेच बाधित होते. रज्जूवर भासणाऱ्या सर्पाची किंवा स्वप्नातील पदार्थांची जी सत्ता, ती प्रातिभासिक सत्ता. ती अधिष्ठानज्ञानाने नाश पावते. शास्त्रदृष्ट्या विचार करता दोनच सत्ता आहेत. १) पारमार्थिक व २) प्रातिभासिक. व्यावहारिक सत्ता हा प्रातिभासिक सत्तेचाच भाग आहे कारण दृश्य जग हे पंचमहाभूतांचे कार्य असल्यामुळे ते मायिकच आहे. अधिष्ठान असलेल्या ब्रह्माच्या ज्ञानाने ते असून नसल्यासारखे होते. त्याचा बाध होतो.
**सन्मात्र** - सत् + मात्र. सत् म्हणजे असणारे, खरे, अस्तित्व, सत्यवस्तू. मात्र म्हणजे केवळ, फक्त. सन्मात्र म्हणजे केवळ अस्तित्व, शुद्ध अस्तित्व.
**सनातन** - शाश्वत - चिरकाल टिकणारा, ब्रह्माचे विशेषण, अखंड अस्तित्व.
**समाधान** - १) मनाची एकाग्रता झाली असतांना जी स्थिती प्राप्त होते तिला समाधान म्हणतात. २) तृप्ती.

**समाधी** - १) निदिध्यासनाची परिपक्व अवस्था २) अष्टांगयोगाचे अष्टम अंग ३) ध्येय वस्तूचे ध्यान करतांना स्वतःची विस्मृती होणे. समाधीचे सबीज आणि निर्बीज असे दोन प्रकार आहेत. धारणेतील समाधी सबीज असून अंतिम साध्यस्वरूपी समाधी निर्बीज असते. पतंजलींच्या मते सबीज समाधीतून निर्बीज समाधी व त्यातून कैवल्य असा समाधीचा उत्कर्ष आहे.

**समानाधिकरण -सामानाधिकरण्य** - अधिकरण म्हणजे स्थल, काल. समान अधिकरण म्हणजे दोन किंवा अधिक वस्तूंचा एकच आश्रय. जेव्हा दोन वस्तूंचा संबंध सांगणे हा हेतू गौण असतो व ऐक्य सांगणे हा मुख्य हेतू असतो तेव्हा 'समानाधिकरण' हा शब्द वापरतात. जेव्हा दोघांमधला संबंध प्रस्थापित करायचा असतो तेव्हा 'सामानाधिकरण्य' हा शब्द वापरतात. १) मुख्य समानाधिकरण - ज्या वस्तूचा ज्या वस्तूशी सदैव अभेद असतो, त्याचे त्याच्याशी मुख्य समानाधिकरण असते. उदा. कूटस्थ आणि ब्रह्म, घटाकाश आणि महाकाश यांचे मुख्य समानाधिकरण आहे. २) बाध समानाधिकरण - ज्या वस्तूचा बाध होऊनच दुसऱ्या वस्तूशी अभेद होतो, तिचे दुसरीशी बाध समानाधिकरण असते. उदा. चिदाभास आणि कूटस्थ. चिदाभासाचा बाध होऊनच त्याचे कूटस्थाशी ऐक्य होते.

**सहजस्थिती** - साधकावस्था संपून आत्मज्ञानाला आलेली सहजावस्था.

**सापेक्ष** - अवलंबून असणारे, संबद्ध. उदा. सुख हे विषयसापेक्ष आहे परंतु आनंद हा कशावरही अवलंबून नसल्याने विषयनिरपेक्ष आहे.

**साधक** - साधना करणारा, वेदान्त शास्त्राचा अभ्यासक, ईश्वरप्राप्तीसाठी तसेच मोक्षासाठी प्रयत्न करणारा.

**साध्य** -जे मिळवावयाचे आहे ते.

**साधू** - शुद्ध मनाचा, मनाचे सर्व विकार ज्याने धुऊन काढले आहेत व त्यामुळे ज्याचे मन अत्यंत शुद्ध झालेले आहे असा.

**साक्षात्कार** -प्रत्यक्ष ज्ञान किंवा अनुभव, ब्रह्मरूप होणे. येथे साक्षात् आकार अभिप्रेत नाही तर ब्रह्मरूप होऊन राहणे अभिप्रेत आहे.

**साक्षीभास्य** - साक्षी म्हणजे आत्मा. तो ज्या पदार्थांचे अविद्यावृत्तीद्वारा प्रकाशन करतो त्या पदार्थांना साक्षीभास्य म्हणतात.

**साक्षेप** - प्रयत्न.

**सिद्ध** - मूळ धातू सिध् = साध्याप्रत पावणे, यशस्वी होणे, जिंकणे. ज्याने आपले ध्येय जिंकले, ज्याला संपूर्ण आत्मज्ञान झाले, ज्याचे अज्ञान समूळ नष्ट झाले तो.

**सुख** - अनुकूल संवेदन म्हणजे सुख.

**स्मृती** - पौरुषेय वाङ्मय, हेतुपुरस्सर व विचारपूर्वक  रचना केलेले धर्मग्रंथ. उदा. भगगवद्गीता, १८ पुराणे, मनुस्मृती, पाराशरस्मृती इ.

**स्वसंवेद्य** - पाच ज्ञानेंद्रिये व सहा प्रमाणे (काहींच्या मते ९ प्रमाणे) यांनी न जाणले जाणारे, ब्रह्माचे विशेषण, केवळ स्वतःच स्वतःला जाणणारे नव्हे तर ज्ञान हेच ज्याचे रूप आहे असे.

## त्र

**त्रिकालाबाधित** -तिन्ही कालात ज्याचा बाध होत नाही ते. नित्य, कायमचे.

**त्रिपुटी** - एखाद्या व्यवहारासाठी मुळात एकच असलेल्या ब्रह्मवस्तूने त्रिधा व्हावे लागते. तीन घटकांच्या या समूहाला त्रिपुटी म्हणतात. ज्ञाता-ज्ञान-ज्ञेय ही आद्य त्रिपुटी होय. संपूर्ण सृष्टी आणि तिच्यातील सर्व व्यवहार म्हणजे केवळ त्रिपुट्यांची क्रीडा आहे. त्रिपुटीलय झाल्याशिवाय जीवब्रह्मैक्याचा अनुभव शक्य नाही. कारण जोपर्यंत त्रिपुटी आहे तोपर्यंत द्वैत आहे.

## श्र

**श्रद्धा** - जीवब्रह्मैक्यविद्येचा उपदेश करणारे श्रीगुरू व वेदान्तवाक्य यांच्या वचनावरील अढळ विश्वास.

## ज्ञ

**ज्ञान** - पदार्थज्ञान, विज्ञान - ब्रह्मज्ञान. १) अपरोक्षज्ञान - जीवब्रह्मैक्याचा प्रत्यक्ष अनुभव २) निर्विशेषज्ञान - ज्ञाता-ज्ञेय-ज्ञान या त्रिपुटीलयानंतर आलेला ज्ञानरूप ब्रह्मवस्तूचा प्रत्यक्ष अनुभव ३) परोक्षज्ञान - अप्रत्यक्ष ज्ञान. शास्त्रीय ग्रंथांच्या श्रवणाने, वाचनाने झालेले परंतु प्रत्यक्ष अनुभव न आलेले ज्ञान. ४) सविशेषज्ञान - कोणाचे तरी किंवा कशाचे तरी (ज्ञेय) कोणाला तरी (ज्ञाता) झालेले ज्ञान (त्रिपुटी असलेले)

ज्ञान आणि विज्ञान हे दोन शब्द निरनिराळ्या ग्रंथकारांनी निरनिराळ्या अर्थाने वापरले आहेत. फक्त ज्ञानेश्वरीत विज्ञान हा शब्द पदार्थज्ञान व ज्ञान हा शब्द ब्रह्मज्ञान ह्या अर्थी वापरला आहे. व्युत्पत्तीप्रमाणे तोही बरोबरच आहे. इतर ग्रंथ वाचतांना विज्ञान हा विशेष ज्ञान किंवा ब्रह्मज्ञान ह्या अर्थाने व ज्ञान हा शब्द पदार्थज्ञान ह्या अर्थाने घ्यावा. असा संदर्भ लक्षात घेऊन वाचन केले नाही तर गोंधळ होण्याचा संभव असतो.

***